RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - १०] शनिवार, ऑगस्ट २३, २०२५ / भाद्र १, शके १९४७ [पृष्ठे १७३

असाधारण क्रमांक १०

प्राधिकृत प्रकाशन

महानगरपालिका आयुक्त यांजकडून

पुणे महानगरपालिका, पुणे

अधिसूचना

परिशिष्ट - ८

क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.२३/का-५/२०२५.--राज्य शासनाने, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या मान्यतेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई ५९) (यापुढे "अधिनियम" म्हणून उल्लेखिलेला) चे कलम ५ *(३)* अन्वये प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे. सदर अधिसूचनेद्वारे पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, प्रारूप मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ५, पोट-कलम *(३)* च्या परंतुकाप्रमाणे पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करावयाचा आहे. ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभाग यांचे आदेश क्र. एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४, दिनांक १० जून २०२५ नुसार सदर अधिसूचनेचा प्रारूप मसुदा राजपत्रात प्रसिद्ध करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत आणि त्यानुसार सदर प्रारूप मसुदा प्रसिद्ध करण्यात येत असून, उक्त अधिसूचनेचा मसुदा दिनांक २२ ऑगस्ट २०२५ नंतर राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने विचारात घेतील.

उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने नागरिकांच्या हरकती किंवा सूचना असल्यास आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी लेखी सादर कराव्यात. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

प्रारूप अधिसूचना

ज्याअर्थी, राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, यांनी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ च्या तरतुदीखाली पुणे महानगरपालिकेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या व प्रभागांची संख्या पुढीलप्रमाणे निश्चित केली आहे :--

एकूण सदस्यांची संख्या - १६५

चार सदस्यीय प्रभागांची संख्या - ४०

तीन सदस्यीय प्रभागांची संख्या - ००

पाच सदस्यीय प्रभागांची संख्या - ०१

एकूण प्रभागांची संख्या - ४१

त्याअर्थी, आता राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र; महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ *(३)* अन्वये उक्त महानगरपालिका क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत आहोत.

या अधिसूचनेच्या तारखेच्या निकटच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ ही अधिसूचना अंमलात येईल.

प्रभाग क्रमांक व लोकसंख्या	प्रभागाचे नाव, असल्यास	प्रभागाची व्याप्ती		निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या
(१)	(२)	(३)		(४)
१ लोकसंख्या एकूण - ९२६४४ अ.जा. - १८०१० अ.ज. - २२७४	कळस- धानोरी	व्याप्ती:	धानोरी गावठाण, कळस गावठाण, गंगाकुंज सोसायटी, लक्ष्मी टाऊनशिप १, २ व ३, ब्रुकसाईड सोसायटी, विशाल परिसर, आर.अँड डी.ई. कॉलनी, भिमनगर वसाहत, सिध्दार्थ नगर, मुंजाबा वस्ती, भैरवनगर, गोकुळ नगर, आनंद पार्क, चौधरी नगर, म्हस्के वस्ती, कळस गणेश नगर, ग्रेफ सेंटर, पोरवाल पार्क, कुतवळ कॉलनी, निंबाळकर नगर, साठे नगर, सिद्धेश्वर नगर कुमार समृद्धी ब्रम्हा स्काय सिटी, खेसे पार्क इ.	४
		उत्तर:	मुळा नदी मोजे कळस व मौजे बोपखेलची हद्दीस जेथे मिळते तेथून उत्तरेस मौजे कळस व मौजे बोपखेलच्या हद्दीने मौजे दिघीच्या हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस पुढे मौजे कळस व मौजे दिघीच्या हद्दीने पुणे-आळंदी रस्ता ओलांडून मौजे धानोरीच्या हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस मौजे धानोरी व मौजे दीघी यांचे हद्दीने मौजे धानोरी, मौजे चन्होली, मौजे दिघी यांची हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पुर्वेस मौजे धानोरी, मौजे चन्होली यांचे हद्दीने मौजे धानोरी व मौजे लोहगांव यांचे हद्दीवरील नाला ओलांडून व पुढे मौजे लोहगांव व मौजे वडगाव शिंदे यांचे हद्दीने वडगाव शिंदे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत.	
		पुर्व:	मौजे लोहगांव व मौजे वडगाव शिंदे यांची हद्द वडगाव शिंदे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यास जेथे मिळते तेथून दक्षिण पश्चिमेस वडगाव शिंदे रस्त्याने छ.शिवाजी चौकात मोझेआळी - वडगाव रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने संत तुकाराम मंदिराजवळ दक्षिण हद्दीस मिळेपर्यंत, (लोहगाव मधील जुना वॉर्ड नं.२ ची दक्षिण हद्द) तेथून पश्चिमेस लोहगाव मधील जुना वॉर्ड नं.२ ची दक्षिण हद्दीने माथाडे वस्तीमधील श्रीराम लोटस सोसायटीच्या पूर्वेकडील हद्दीस मिळेपर्यंत तेथून उत्तरेस सदर हद्दीने लोहगाव -वडगाव शिंदे रस्त्यास मिळेपर्यंत तेथून दक्षिणेस व पुढे विश्रांतवाडी-लोहगाव रस्त्याने कलवड वस्तीमधील रस्त्यास मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	धानोरी - लोहगाव रस्ता कलवड वस्ती मधील रस्त्यास जेथे मिळतो तेथून उत्तरेस कलवड वस्तीमधील रस्त्याने स्टार अपार्टमेंटच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने धानोरी - टिंगरेनगर मधील नाल्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिण पश्चिमेस सदर नाल्याने हवालदार मळ्यातील नंदन	

			युफोरिया सोसायटी, सिद्धेश्वर नगर, कुमार समृध्दी सोसायटीच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने एकता नगर जवळ सिद्धेश्वर नगरकडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस व पुढे दक्षिणेस सिद्धेश्वर नगरच्या पूर्वेकडील रस्त्याने विश्रांतवाडी लोहगांव रस्त्यास मिळेपर्यंत, (मुकुंदराव आंबेडकर रस्त्यास) तेथून पश्चिमेस विश्रांतवाडी लोहगाव रस्त्याने मुकुंदराव आंबेडकर चौकात (विश्रांतवाडी चौकात) पुणे आळंदी रस्त्यास (संत ज्ञानेश्वर रस्त्यास) मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	विश्रांतवाडी लोहगाव रस्ता मुकुंदराव आंबेडकर चौकात (विश्रांतवाडी चौकात) पुणे आळंदी रस्त्यास (संत ज्ञानेश्वर रस्त्यास) जेथे मिळतो तेथून उत्तरेस पुणे आळंदी रस्त्याने व पुढे मौजे कळस मधील छ.शिवाजी महाराज रस्त्याने कळस मधील प्रेमलोक प्लाझा सोसायटीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने मधुबन सोसायटीच्या पूर्वेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर हद्दीने जाधव वस्तीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत. (सेंट चावरा केथेलिक चर्चच्या दक्षिणेकडील हद्द) तेथून पश्चिमेस सदर हद्दीने कळस स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून सदर रस्त्याने व पुढे कळस स्मशानभूमीच्या पश्चिमेकडील हद्दीने मुळा नदीस मिळेपर्यंत, तेथून उत्तर पश्चिमेस मुळा नदीने मौजे कळस व मौजे बोपखेलची हद्दीस मिळेपर्यंत.	
२ **लोकसंख्या** **एकूण - ९२६४०** **अ.जा. - २१००३** **अ.ज. - १३५६**	**फुलेनगर- नागपूर चाळ**	**व्याप्ती:**	महालक्ष्मी विहार, विश्रांत सोसायटी, मधुबन सोसायटी टिंगरे नगर, आदर्श नगर, नागपूर चाळ, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, शांतीनगर, मोहन वाडी, प्रतिक नगर, इंदिरानगर, फुले नगर, येरवडा मेंटल हॉस्पिटल, राम सोसायटी, हरी गंगा सोसायटी, पंचशिल नगर, माजी सैनिक वसाहत, विश्रांतवाडी पोलीस लाईन, राजीव गांधी वसाहत, कॉमर झोन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलनी, टिंगरे नगर गल्ली नं. १ ते १४, एकता नगर, त्रिदल नगर इ.	४
		उत्तर:	कळस स्मशानभूमीच्या पश्चिमेकडील हद्द मुळा नदीस जेथे मिळते तेथून उत्तरपूर्वेस सदर हद्दीने व पुढे कळस स्मशानभूमीकडे येणाऱ्या रस्त्याने जाधव वस्तीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत. (सेंट चावरा केथेलिक चर्चच्या दक्षिणेकडील हद्द) तेथून पूर्वेस सदर हद्दीने मधुबन सोसायटीच्या पूर्वेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर हद्दीने प्रेमलोक प्लाझा सोसायटीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने मौजे कळस मधील छ.शिवाजी महाराज रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून	

	दक्षिणेस सदर रस्त्याने व पुढे आळंदी रस्त्याने (संत ज्ञानेश्वर रस्त्याने) मुकुंदराव आंबेडकर चौकात विश्रांतवाडी लोहगाव रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने सिद्धेश्वर नगर सोसायटीच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने एकतानगरकडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, पुढे उत्तरेस कुमार समृध्दी सोसायटी, आणि नंदन युफोरिया सोसायटीच्या पूर्वेकडील रस्त्याने धानोरी - टिंगरेनगर मधील नाल्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तर पूर्वेस सदर नाल्याने टिंगरेनगर गल्ली क्र. १४ ला मिळेपर्यंत.
पुर्व:	धानोरी - टिंगरेनगर मधील नाला टिंगरेनगर गल्ली क्र. १४ ला जेथे मिळतो तेथून दक्षिणेस टिंगरेनगर गल्ली क्र. १४ ने विश्रांतवाडी - लोहगाव रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने विश्रांतवाडी लोहगांव रस्त्याने ५०९ चौकात नॅशनल गेम रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस नॅशनल गेम रस्त्याने संजय पार्क कडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस संजय पार्क मधील रस्त्याने व पुढे पूर्वेस संजय पार्कच्या दक्षिणेकडील हद्दीने संजय पार्क गल्ली क्र. ५ डी रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने संजय पार्क गल्ली क्र. ५ ला मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस गल्ली क्र. ५ ने अमीर चिकन शॉपच्या पूर्वेकडील गल्लीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर गल्लीने विमाननगर पार्किंगच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने नवीन एअरपोर्ट रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस संजय पार्क येथील झोपडपट्टीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस व पुढे दक्षिणेस सदर हद्दीने व पुढे पूर्वेस संजय पार्क मधील झोपडपट्टीच्या दक्षिणेकडील हद्दीने नवीन एअरपोर्ट रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने डंकर्क लाईनच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस व पुढे दक्षिणेस सदर हद्दीने पुणे अहिल्यानगर रस्त्यास रामवाडी चौकाजवळ मिळेपर्यंत.
दक्षिण:	पुणे अहिल्यानगर रस्ता रामवाडी चौकात डंकर्क लाईनच्या दक्षिणेकडील हद्दीस जेथे मिळतो तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने डंकर्क लाईनच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस डंकर्क लाईनच्या पश्चिमेकडील हद्दीने महाराष्ट्र विभागीय क्रीडा संकुलच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने गेनबा मोझे रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने दुर्गाभवानी चौकात शांतीरक्षक सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस शांतीरक्षक सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्याने नॅशनल गेम रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने येरवडा जेलच्या

			उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने व पुढे दक्षिणेस येरवडा जेलच्या पश्चिमेकडील रस्त्याने येरवडा प्रेस कॉलनी मधील पूर्व पश्चिम रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने येरवडा जेलच्या पश्चिमेकडील डी.पी. रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर डी.पी. रस्त्याने सम्राट अशोक रस्ता ओलांडून पुढे दक्षिणेस कॉमरझोनच्या पूर्वेकडील डी.पी. रस्त्याने गोल्फ क्लबच्या हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिण पश्चिमेस गोल्फ क्लबच्या हद्दीने लूप रस्त्यास (कै.सदाशिव रामभाऊ निकम रस्त्यास) मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने पुणे आळंदी रस्त्यावरील खडकी कॅन्टोन्मेंटच्या मनपा हद्दीस मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	लूप रस्ता (कै.सदाशिव रामभाऊ निकम रस्ता) पुणे आळंदी रस्त्यावरील खडकी कॅन्टोन्मेंटच्या मनपा हद्दीस जेथे मिळतो तेथून उत्तरेस खडकी कॅन्टोन्मेंटच्या मनपा हद्दीने (मुळा नदीने) कळस स्मशानभूमीच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत.	
३ **लोकसंख्या** **एकूण -९२४१०** **अ.जा. -१००८२** **अ.ज. -१०१७**	**विमाननगर -- लोहगाव**	**व्याप्ती**:	लोहगाव गुरुद्वारा परिसर, लोहगांव विमानतळ, विमाननगर, फिनीक्स मॉल, एअर फोर्स कॅम्पस, पुरु सोसायटी, संजय पार्क, गंगा हॅम्लेट, इन-ऑरबीट मॉल, सोमनाथ नगर, क्लोव्हर पार्क, प्राईड रिजेन्सी, रोहन मिथिला सोसायटी, बॉम्बे सेपर्स कॉलनी, सुनिता नगर, करण आशियाना, वाघोली - रोहन अभिलाशा टाऊनशिप, भैरवनाथ तलाव परिसर, श्री राम लोट्स सोसायटी, माथाडे वस्ती, संत नगर, साईधाम कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी, पूर्वरंग सोसायटी इ.	४
		उत्तर:	टिंगरेनगर गल्ली क्र. १४ चा रस्ता धानोरी टिंगरेनगर मधील नाल्यास जिथे मिळतो तेथून उत्तरेस सदर नाल्याने कलवड वस्तीमधील स्टार अपार्टमेंटच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने कलवड वस्तीमधील रस्त्यास मिळेपर्यंत तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने विश्रांतवाडी लोहगाव रस्त्यास मिळेपर्यंत तेथून उत्तर पूर्वेस सदर रस्त्याने व पुढे लोहगाव वडगाव शिंदे रस्त्याने माथाडे वस्तीमधील श्रीराम लोटस सोसायटीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत तेथून पूर्वेस पुढे दक्षिणेस श्रीराम लोटस सोसायटीच्या पूर्वेकडील हद्दीने लोहगाव मधील जुना वॉर्ड नं.२ ची दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत तेथून पूर्वेस सदर हद्दीने संत तुकाराम मंदिराजवळ मौजे आळी वडगाव रस्त्यास मिळेपर्यंत तेथून उत्तरेस सदर रस्त्याने वडगाव शिंदे रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पूर्वेस व पुढे उत्तरेस वडगाव शिंदे रस्त्याने मौजे लोहगाव व मौजे वडगाव शिंदे यांच्या हद्दीस मिळेपर्यंत तेथून पूर्वेस सदर हद्दीने इंद्रायणी नदीस मिळेपर्यंत.	

पुर्व:	मौजे लोहगाव व मौजे वडगाव शिंदे यांची हद्द जेथे इंद्रायणी नदीस मिळते तेथून दक्षिणपूर्वेस इंद्रायणी नदीने मौजे लोहगाव व मौजे भावडीच्या हद्दीस मिळेपर्यत, तेथून दक्षिणेस सदर हद्दीने मौजे वाघोली व मौजे भावडीच्या हद्दीस मिळेपर्यत तेथून पूर्वेस सदर हद्दीने मौजे वाघोली व मौजे लोणीकंद यांचे हद्दीस मिळेपर्यंत तेथून दक्षिणेस सदर हद्दीने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यत तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने सिद्धार्थनगर गल्ली क्र. ३ ला मिळेपर्यत.
दक्षिण:	पुणे अहिल्यानगर रस्ता सिद्धार्थनगर गल्ली क्र. ३ ला जेथे मिळतो तेथून उत्तरेस सदर रस्त्याने सुखवानी पाम्स सोसायटीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यत तेथून पश्चिमेस सदर हद्दीने वाघोली गावठाणाच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यत तेथून उत्तरेस सदर रस्त्याने (अमृतनगरी सोसायटीच्या दक्षिणेकडील हद्द) भैरवनाथ तळ्याच्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यत तेथून पश्चिमेस व पुढे दक्षिणेस वाघोली भावडी रस्त्याने लोहगाव वाघोली रस्ता ओलांडून पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यत तेथून पश्चिमेस पुणे अहिल्यानगर रस्त्याने व पुढे मौजे खराडी व मौजे लोहगावच्या हद्दीने खराडीमधील फ़ाऊंटन रस्त्यास मिळेपर्यत तेथून उत्तरेस सदर रस्त्याने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यत तेथून पूर्वेस पुणे अहिल्यानगर रस्त्याने लोहगांव स.नं.१२७ च्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस एअर फोर्सच्या हद्दीस मिळेपर्यत, तेथून पश्चिमेस व पुढे दक्षिणेस एअर फोर्सच्या हद्दीने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने वडगांवशेरी खराडी हद्दीवरील हरिभाऊ गलांडे रस्त्यास मिळेपर्यत तेथून दक्षिणेस हरीभाऊ गलांडे पथाने गणेश नगर रस्त्यास (स. नं. ४७/३ वडगांवशेरी च्या दक्षिणेकडील रस्ता) मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस गणेशनगर रस्त्याने स्वामी समर्थ मंदिराजवळील चौक ओलांडून पुढे दत्तप्रसाद सोसायटीच्या दक्षिणेकडील रस्त्याने अशोक सुपर मार्केटसमोरील दक्षिणोत्तर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर दक्षिणोत्तर रस्त्याने ग्रेवाल हौसिंग सोसायटीच्या पश्चिमेकडील सोमनाथनगर लेन क्र.२ ला मिळेपर्यंत(पार्वती इमारतीच्या दक्षिणेकडील रस्ता) तेथून पश्चिमेस सदर लेन क्र.२ ने व पुढे मोरया पार्क सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्याने सोमनाथनगर मधील दक्षिणोत्तर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने रामचंद्र खंडूजी गलांडे पथास मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस रामचंद्र खंडूजी गलांडे पथाने सोपाननगरच्या पश्चिमेकडील दक्षिणोत्तर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सोपाननगरच्या पश्चिमेकडील दक्षिणोत्तर रस्त्याने पुणे नगर

			रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस पुणे अहिल्यानगर रस्त्याने रामवाडी चौकात डंकर्क लाईनच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यत.	
		पश्चिम:	पुणे अहिल्यानगर रस्ता रामवाडी चौकात डंकर्क लाईनच्या पश्चिमेकडील हद्दीस जिथे मिळतो तेथून उत्तरेस डंकर्क लाईनच्या पूर्वेकडील हद्दीने संजय पार्क मधील झोपडपाट्टीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यत तेथून सदर हद्दीने नवीन एअर पोर्ट हद्दीस मिळेपर्यत तेथून उत्तरेस सदर रस्त्याने विमाननगर पार्किंग च्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने अमीर चिकन शॉपच्या पूर्वेकडील गल्लीस मिळेपर्यंत तेथून दक्षिणेस संजय पार्क लेन नं. ५ ला मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस लेन ५ ने संजय पार्क लेन नं. ५ डी च्या रस्त्यास मिळेपर्यत, तेथून दक्षिणेस डंकर्क लाईनच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यत तेथून पश्चिमेस व पुढे उत्तरेस संजय पार्क रस्त्याने नॅशनल गेम रस्त्यास मिळेपर्यत पुढे उत्तरेस सदर रस्त्याने ५०९ चौकात विश्रांतवाडी लोहगांव रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस विश्रांतवाडी लोहगांव रस्त्याने टिंगरेनगर गल्ली क्र. १४ च्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस गल्ली क्र. १४ च्या रस्त्याने धानोरी टिंगरेनगर मधील नाल्यास मिळेपर्यंत.	
४ **लोकसंख्या** **एकूण -९२२८३** **अ.जा. -१२८६१** **अ.ज. -१०३७**	**खराडी - वाघोली**	**व्याप्ती**:	आपले घर सोसायटी, पठारे - ठुबे नगर, मथुरा नगर, प्रतिक नगर, राघवेंद्र नगर, यशवंत नगर, बोराटे वस्ती, तुकाराम नगर, राघोबा पाटील नगर, थिटे नगर, खराडी गांव, रक्षक नगर, पंढरी नगर, अशोक नगर, तुळजा भवानी नगर, राजाराम पाटील नगर, हनुमान नगर, शांतीनगर, खुळेवाडी, पंचशील टॉवर- वाघोली, चंदन नगर, विडी कामगार वसाहत, ईऑन आय.टी. पार्क, झेन्सर आय.टी. पार्क, चौधरी वस्ती, आनंद नगर (भाग) अल्फा लँडमार्क, रविनंद स्कायलाइट्स, क्रांती बुद्ध विहार परिसर, गुलमोहर प्राइम रोझ, इवी बोटानिका, आरंभ सोसा., उमंग प्रीमिअर, इवी निया प्रोजेक्ट, न्याती एलान फेज १, निओ सिटी फेज१,२, भारतीय जैन संघटना मुलांचे वसतिगृह, बकोरी रोड, ऑक्सी व्हॅली फेज १,२, त्रिमूर्ती, काळूबाई नगर, चंदननगर पाण्याची टाकी, उबाळे नगर, इ.	४
		उत्तर:	पुणे-अहिल्यानगर रस्ता व वडगांवशेरी खराडी हद्दीवरील (हरीभाऊ गलांडे पथ) रस्ता जेथे एकमेकास मिळतात तेथून पूर्वेस पुणे-नगर रस्त्याने एअर फोर्स स्टेशनच्या हद्दीस (लोहगांव स.नं १४० चे पश्चिमेकडील हद्दीस) मिळेपर्यंत तेथून उत्तरेस एअर फोर्स स्टेशनच्या हद्दीने व पुढे पुर्वेस बाँब गोडाऊन पुर्व हद्दीने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यत, तेथून पश्चिमेस सदर	

	रस्त्याने खराडी मधील फाऊंटन रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने मौजे खराडी व मौजे लोहगाव च्या हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने व पुढे पूर्वेस पुणे अहिल्यानगर रस्त्याने वाघोली भावडी रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने लोहगाव - वाघोली रस्ता ओलांडून भैरवनाथ तलावाच्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने व पुढे दक्षिणेस वाघोली गावठाणाच्या पूर्वेकडील रस्त्याने सुखवानी फार्म्सच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने सिद्धार्थ नगर मधील लेन क्र. ३ ला मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तर पूर्वेस सदर रस्त्याने मौजे वाघोली व मौजे लोणीकंदच्या हद्दीस मिळेपर्यंत.
पुर्व:	पुणे अहिल्यानगर रस्ता, मौजे वाघोलीची हद्द मौजे लोणीकंदच्या हद्दीस जेथे मिळतो, तेथून दक्षिणेस मौजे वाघोली व मौजे लोणीकंद, मौजे केसनंद, मौजे आव्हाळवाडी, मौजे मांजरी खुर्द यांचे हद्दीने मुळा मुठा नदीस मिळेपर्यंत.
दक्षिण:	मौजे वाघोली व मौजे मांजरी खुर्द यांची हद्द मुळा मुठा नदीस जेथे मिळते तेथून पश्चिमेस मुळा मुठा नदीने मौजे खराडीमधील रिव्हरडेल ग्रँड सोसायटीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर हद्दीने रिव्हरडेल युनिटी प्रकल्पाच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर हद्दीने श्रीकृष्ण कॉलनीतील गल्ली क्र. १ ला मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर गल्ली क्र. १ ने व पुढे ग्रेशियस गार्डन इमारतीच्या उत्तरेकडील रस्त्याने ग्रेशियस गार्डन इमारतीच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने आशियाना इमारतीच्या उत्तरेकडील रस्त्याच्या सरळ रेषेस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याच्या सरळ रेषेने व पुढे रस्त्याने थिटे वस्तीतील गल्ली क्र. १४ ला मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस गल्ली क्र. १४ ने दत्त चौक ओलांडून अद्विक मेडिकलच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस गुलमोहर पॅरेडाईज च्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पुढे उत्तर पश्चिमेस सदर हद्दीने स.न. १३, काळूबाई नगर, थिटे वस्ती मधील रामचंद्र निवास इमारतीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने (एंजल हाऊस अपार्टमेंट च्या दक्षिणे कडील हद्दीने) तळजाई बिरोबा निवास इमारतीच्या पूर्वेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर हद्दीने व पुढे पश्चिमेस तळजाई बिरोबा निवास इमारतीच्या उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील हद्दीने वैष्णवी पार्क इमारतीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने व पुढे हॉटेल

			फेअरफिल्ड च्या दक्षिणेकडील रस्त्याने खराडी मुंढवा बायपास रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने मुळा मुठा नदीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस मुळा मुठा नदीने मौजे वडगांवशेरी खराडी हद्दीवरील रस्त्यास (हरिभाऊ गलांडे पथास) मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	मुळा-मुठा नदी वडगांवशेरी खराडी हद्दीवरील रस्त्यास (हरिभाऊ गलांडे पथास) जेथे मिळते तेथून उत्तरेस वडगांवशेरी खराडी हद्दीवरील रस्त्याने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यंत.	
५ **लोकसंख्या** **एकूण -९१३८१** **अ.जा. -८४०३** **अ.ज. - ७९१**	**कल्याणी नगर - वडगावशेरी**	**व्याप्ती:**	कल्याणी नगर, रामवाडी, सैनिक वाडी, मते नगर, वडगांवशेरी, कुमार प्रिमावीरा, गणेश नगर, बाजीराव नगर, महादेव नगर, गलांडे नगर, दिगंबर नगर, आदर्श नगर, आगाखान पॅलेस, मेरिगोल्ड कॉम्प्लेक्स, ब्रम्हा सनसिटी, साईनाथ नगर येरवडा स्टड फार्म , हर्म्स हेरीटेज, शांती रक्षक सोसायटी पेपल सेमिनरी इ.	४
		उत्तर:	पुणे-अहिल्यानगर रस्ता येरवडा हिंदू स्मशानभूमी रस्त्यास कै. सुरेश भोकरे चौकात जेथे मिळतो तेथून पूर्वेस पुणे अहिल्यानगर रस्त्याने गेनबा मोझे रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने शांतीरक्षक सोसायटीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने व पुढे उत्तरपश्चिमेस क्रिएटीसिटी मॉलकडे येणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने शांतीरक्षक सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने गेनबा मोझे रस्त्यास दुर्गा भवानी चौकात मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने महाराष्ट्र विभागीय क्रीडा संकुलच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने डंकर्क लाईनच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर हद्दीने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस पुणे अहिल्यानगर रस्त्याने सोपान नगर च्या पश्चिमेकडील दक्षिणोत्तर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने रामचंद्र खंडूजी गलांडे पथास मिळेपर्यंत तेथून पूर्वेस रामचंद्र खंडूजी गलांडे रस्त्याने सोमनाथ नगर मधील दक्षिणोत्तर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने सातव निवास जवळ मोरया पार्क सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पूर्वेस सदर रस्त्याने व पुढे सोमनाथनगर लेन क्र.२ ने अशोक सुपर मार्केट समोरील दक्षिणोत्तर रस्त्यास मिळेपर्यंत तेथून उत्तरेस सदर दक्षिणोत्तर रस्त्याने दत्तप्रसाद सोसायटीच्या दक्षिणेकडील पुर्व-पश्चिम रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पूर्वेस सदर पुर्व-पश्चिम रस्त्याने स्वामी समर्थ मंदिराजवळील चौक ओलांडून वडगांवशेरी खराडी हद्दीवरील रस्त्यास (हरीभाऊ गलांडे रस्तास) मिळेपर्यंत.	

		पुर्व:	दत्तप्रसाद सोसायटीच्या दक्षिणेकडील पुर्व-पश्चिम रस्ता वडगांवशेरी खराडी हद्दीवरील रस्त्यास (हरीभाऊ गलांडे रस्तास) जेथे मिळतो, तेथून दक्षिणेस वडगांवशेरी खराडी हद्दीवरील हरिभाऊ गलांडे रस्त्याने मुळामुठा नदीस मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	मुळा-मुठा नदी जेथे वडगांवशेरी खराडी हद्दीवरील रस्त्यास (हरीभाऊ गलांडे रस्तास) मिळते तेथून पश्चिमेस मुळा-मुठा नदीने येरवडा हिंदू स्मशानभूमी मधील रस्त्यास अमरेश्वर घाटाजवळ मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	मुळा मुठा नदी येरवडा हिंदू स्मशानभूमी मधील रस्त्यास अमरेश्वर घाटाजवळ जेथे मिळते तेथून उत्तरेस सदर रस्त्याने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यंत.	
६ **लोकसंख्या** **एकूण -७७६०६** **अ.जा. -२०९५८** **अ.ज. - ८४९**	**येरवडा - गांधीनगर**	**व्याप्ती:**	येरवडा गांव, काश्मिरी कॉलनी, नवी खडकी गावठाण, शिला साळवे नगर, अशोक नगर, गुंजन सिनेमा, कामराज नगर, बालाजी नगर, सुभाष नगर, यशवंत नगर, मदर तेरेसा नगर, भाट नगर, कुमार आंगण, कुमार पर्णकुटी, जय जवान नगर (पार्ट), गांधी नगर, व्हाईट हाउस सोसायटी, येरवडा हॉट मिक्स प्लान्ट, सर्व धर्म सोसायटी, डॉन बॉस्को हायस्कूल, GST भवन, बिझनेस बे कॉमप्लेस, मुथा टॉवर्स, क्रिएटीसिटी मॉल, गोल्फ क्लब, येरवडा जेल, जाई जुई शासकिय वसाहत इ.	४
		उत्तर:	येरवडा हॉटमिक्स प्लांटच्या पश्चिमेकडील रस्ता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गोल्फ क्लबच्या हद्दीस जेथे मिळतो, तेथून उत्तर पूर्वेस गोल्फ क्लबच्या हद्दीने कोमर झोनच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने सम्राट अशोक रस्ता ओलांडून येरवडा प्रेस मधील पूर्व पश्चिम रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने येरवडा जेलच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने व पुढे पूर्वेस येरवडा जेलच्या उत्तरेकडील रस्त्याने नॅशनल गेम्स रस्त्यास मिळेपर्यंत.	
		पुर्व:	येरवडा जेलच्या उत्तरेकडील रस्ता नॅशनल गेम्स रस्त्यास जेथे मिळतो, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने शांतीरक्षक सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस शांतीरक्षक सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्याने क्रिएटीसिटी मॉलकडे येणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत तेथून दक्षिणपूर्वेस सदर रस्त्याने शांतीरक्षक सोसायटीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने गेनबा मोझे रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने पुणे अहिल्यानगर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिण	

			पश्चिमेस पुणे अहिल्यानगर रस्त्याने कै. सुरेश भोकरे चौकात येरवडा हिंदू स्मशान भूमीमधील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने अमरेश्वर घाटाजवळ मुळा-मुठा नदीस मिळेपर्यंत.	
			दक्षिण: येरवडा हिंदू स्मशान भूमीमधील रस्ता अमरेश्वर घाटाजवळ मुळा-मुठा नदीस जेथे मिळतो तेथून पश्चिमेस मुळा-मुठा नदीने डेक्कन कॉलेज रस्त्यास बंडगार्डन पुलावर मिळेपर्यंत.	
			पश्चिम: मुळा-मुठा नदी डेक्कन कॉलेज रस्त्यास बंडगार्डन पुलावर जेथे मिळते तेथून उत्तरेस डेक्कन कॅालेज रस्त्याने भारतरत्न कै. राजीव गांधी हॉस्पिटलच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने व पुढे उत्तरेस मेथडिस्ट मराठी चर्चच्या पूर्वेकडील रस्त्याने तसेच पुढे उत्तरेस कुमार पर्णकुटीच्या पश्चिमेकडील रस्त्याने गुरुद्वाराच्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत. (हकीम अजमल खान उर्दु हायस्कूल आणि क्रांतिवीर लहूजी वस्ताद सांस्कृतिक भवन यांच्या उत्तरेकडील रस्ता) तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने शहीद भगतसिंग चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने डेक्कन कॉलेजच्या पूर्वेकडील डी. पी. रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर डी. पी. रस्त्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गोल्फ क्लबच्या हद्दीस मिळेपर्यंत.	
७ **लोकसंख्या** **एकूण -८९९५७** **अ.जा. -१५०६७** **अ.ज. -१६०४**	**गोखलेनगर - वाकडेवाडी**	**व्याप्ती**:	पाटील इस्टेट, भोसले नगर, अशोक नगर, कमल नयन बजाज उद्यान, साखर संकुल, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, वाकडेवाडी, संगमवाडी गावठाणा व्यतिरिक्त संगमवाडीचा भाग, मुळा रोड, भैया वाडी, इंदिरा गांधी वसाहत, जगदीश नगर, गोखलेनगर, जनवाडी, चर्तुश्रृंगी माता मंदिर, चर्तुश्रृंगी परिसर, पंचवटी-पाषाण , सकाळ नगर, अभिमानश्री सोसायटी, शासकीय तंत्र निकेतन, खैरेवाडी, ICS कॉलनी, गजानन महाराज उद्यान, वन भवन, पत्रकार नगर डेक्कन कॉलेज इ.	४
		उत्तर:	ए.आर.डी.ई. ची पूर्वेकडील हद्द डॉ. होमी भाभा रस्त्यास (पाषाण रस्त्यास) जेथे मिळते, तेथून पूर्वेस डॉ. होमी भाभा रस्त्याने NCL च्या पूर्वेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर हद्दीने बाणेर रस्ता ओलांडून पुढे उत्तरेस निलगिरी लेनने इंदिरा गांधी वसाहतीच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने व पुढे यशदाच्या पश्चिमेकडील रस्त्याने बाणेर रस्त्यास मिळेपर्यंत, बाणेर रस्त्याने आचार्य आनंद ऋषिजी महाराज चौकात (पुणे विद्यापीठ चौक) पुणे विद्यापीठाच्या दक्षिणेकडील	

			हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तर पूर्वेस सदर हद्दीने खडकी कँन्टोन्मेंटच्या हद्दीस मिळेपर्यंत तेथून पूर्वेस खडकी कँन्टोन्मेंटच्या हद्दीने मुळा नदी ओलांडून व पुढे उत्तरेस आळंदी रस्त्याने कै. सदाशिव रामभाऊ निकम रस्त्यास (लूप रस्त्यास) मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने येरवडा हॉट मिक्स प्लांट च्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत.	
			पुर्व: कै. सदाशिव रामभाऊ निकम रस्ता येरवडा हॉट मिक्स प्लांट च्या पश्चिमेकडील रस्त्यास जेथे मिळतो तेथून दक्षिणेस येरवडा हॉट मिक्स प्लांट च्या पश्चिमेकडील रस्त्याने डेक्कन कॉलेज रस्ता ओलांडून पुढे दक्षिणेस योजना पोल्ट्री फार्मच्या पश्चिमेकडील नाल्याने मुळा मुठा नदीस मिळेपर्यंत.	
			दक्षिण: मुळा-मुठा नदी योजना पोल्ट्री फर्मच्या पश्चिमेकडील नाल्यास जेथे मिळते तेथून पश्चिमेस मुळा नदीने पाटील इस्टेटच्या दक्षिणेकडील रस्त्यास संगमवाडी पूलावर मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने जुन्या पुणे - मुंबई रस्त्यास मिळेपर्यंत तेथून दक्षिण पूर्वेस पुणे मुंबई रस्त्याने अभियांत्रिकी महाविद्यालय चौकात एच. के. फिरोदिया पूलावरील रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने संचेती हॉस्पिटल जवळ पुणे - मुंबई रेल्वे लाईनला मिळेपर्यत तेथून उत्तरेस सदर रेल्वे लाईनने शिवाजीनगर रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील पूर्व पश्चिम रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने छत्रपती शिवाजीनगर मेट्रो स्टेशनच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत तेथून उत्तरेस सदर रस्त्याने साखर संकुलच्या पूर्वेकडील के.बी. जोशी पथास मिळेपर्यंत तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने वीर चाफेकर चौकात पुणे विद्यापीठ रस्त्यास (गणेशखिंड रस्त्यास) मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस पुणे विद्यापीठ रस्त्याने गोखले रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने पानकुंवर फिरोदिया रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने सेनापती बापट रस्त्यास मिळेपर्यंत तेथून दक्षिणेस सेनापती बापट रस्त्याने बालभारतीच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत तेथून दक्षिणे पश्चिमेस बालभारतीच्या पश्चिमेकडील हद्दीने व पुढे मौजे एरंडवणा व मौजे शिवाजीनगर (भांबुर्डा)यांच्या सामाईक हद्दीने मौजे पाषाणच्या हद्दीस वेताळ टेकडीजवळ मिळेपर्यंत.	
			पश्चिम: मौजे शिवाजीनगर (भांबुर्डा), मौजे एरंडवणा यांची सामाईक हद्द वेताळ टेकडीजवळ मौजे पाषाणच्या हद्दीस जेथे मिळते, तेथून उत्तरपश्चिमेस मौजे पाषाण व मौजे शिवाजीनगर (भांबुर्डा) यांचे सामाईक हद्दीने व पुढे मौजे एरंडवणा आणि मौजे पाषाण यांच्या हद्दीने ए.आर.डी. ई च्या पूर्वेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस ए.आर.डी. ई च्या पूर्वेकडील हद्दीने डॉ. होमी भाभा रस्त्यास मिळेपर्यंत.	

८ **लोकसंख्या** **एकूण -८९६९३** **अ.जा. -१६७४३** **अ.ज. -१४०२**	**औंध - बोपोडी**	**व्याप्ती:**	बोपोडी गावठाण, औंध गावठाण,कोहिनूर प्लॅनेट, बोटॅनिकल गार्डन, सावंत नगरी, अनुपम नगर, बोपोडी, चिखलवाडी, एन.सी.एल, सिंध सोसायटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, आनंद पार्क, सानेवाडी, औंध - बाणेर क्षेत्रीय कार्यालय, नॅशनल सोसायटी, किर्लोस्कर ऑईल इंजिन, आय.टी.आय. औंध, शिरीन गार्डन, विधाते-मुरकुटे वस्ती (भाग), मेडीपॉईंट हॉस्पिटल, तेजस्वीनी सोसायटी, कस्तुरबा वसाहत, राजभवन इ.	४
		उत्तर:	रामनदी व मुळा नदी जेथे एकमेकांस मिळतात तेथून पूर्वेस मुळा नदीने हॅरीस रेल्वे पूल ओलांडून मुळा नदीने खडकी कॅन्टोनमेंट हद्दीस (कुंदन कुशल नगर सोसायटी जवळ) मिळेपर्यंत.	
		पुर्व:	मुळा नदी खडकी कॅन्टोनमेंट हद्दीस जेथे मिळते तेथून दक्षिणेस खडकी कॅन्टोनमेंटच्या हद्दीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	खडकी कॅन्टोनमेंटची हद्द सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दक्षिणेकडील हद्दीस जेथे मिळते तेथून पश्चिमेस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दक्षिणेकडील हद्दीने आचार्य आनंद ऋषीजी चौक ओलांडून पुढे पश्चिमेस बाणेर रस्त्याने यशदाच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने व पुढे इंदिरा गांधी वसाहतीच्या पूर्वेकडील रस्त्याने निलगिरी लेनला मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस बाणेर रस्ता ओलांडून पुढे NCL च्या पूर्वेकडील हद्दीने डॉ. होमी भाभा रस्त्यास (पाषाण रस्ता) मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस डॉ. होमी भाभा रस्त्याने IISER च्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	डॉ. होमी भाभा रस्ता IISER च्या पश्चिमेकडील हद्दीस जेथे मिळतो तेथून उत्तरेस IISER च्या पश्चिमेकडील हद्दीने बाणेर रस्ता ओलांडून तेथून उत्तरेस औंध बाणेर हद्दीने सिझन हॉटेलच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पुर्वेस सदर रस्त्याने आंबेडकर चौकातून येणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस आंबेडकर चौक ओलांडून सदर रस्त्याने ज्ञानेश्वर (माऊली) मुकुंदराव मुरकुटे पथास मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस सदर पथाने एस. एस. कम्युनिकेशन जवळ नाल्याकडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने औंध - सानेवाडी मधून येणाऱ्या नाल्यास पूलाजवळ मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर नाल्याने राम नदीस मिळेपर्यंत तेथून उत्तरेस राम नदीने मुळा नदीस मिळेपर्यंत.	

९ **लोकसंख्या** **एकूण -९०९०३** **अ.जा. -१०३६७** **अ.ज. -२१५४**	**सुस- बाणेर-पाषाण**	**व्याप्ती:**	बालेवाडी गावठाण, बाणेर गांवठाण, पाषाण गावठाण, सुतारवाडी, सूस, म्हाळुंगे, एलिट एम्पायर सोसायटी, नंदन प्रॉस्पेरा, ए.आर.डी.ई. भारत इलेक्ट्रॉनिक्स, पाषाण तलाव, सोमश्वर वाडी, संजय गांधी नगर, विधाते-मुरकुटे वस्ती (भाग), समर्थ कॉलनी, वीरभद्र नगर, वसंत विहार, लक्ष्मण नगर, राम नगर, पारखे वस्ती, विद्या वॅली स्कूल, विंडोज सोसायटी, सुखवानी ग्रेसिया, शितलादेवी नगर, बेलाकासा सोसायटी, विस्परिंग विंड सोसायटी लमाण वस्ती इ.	४
		उत्तर:	मौजे नांदे व मौजे म्हाळुंगे यांची सामायिक हद्द (पुणे मनपा हद्द) मुळानदीस जेथे मिळते तेथून पूर्वेस व पुढे दक्षिणेस व पुढे पुन्हा पूर्वेस मुळा नदीने राम नदीस मिळेपर्यंत.	
		पुर्व:	राम नदी मुळा नदीस जेथे मिळते तेथून दक्षिणेस राम नदीने औंध-सानेवाडी मधून येणाऱ्या नाल्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर नाल्याने पूलावर एस.एस. कम्युनिकेशन या दुकानाजवळील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने ज्ञानेश्वर (माऊली) मुकुंदराव मुरकुटे पथास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाजवळील औंध बाणेर हद्दीवरील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ओलांडून पुढे सदर रस्त्याने सिझन हॉटेल लगतच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने औंध बाणेर हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर हद्दीने बाणेर रस्ता ओलांडून पुढे दक्षिणेस इंडियन इस्टिट्युट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च संस्थेच्या पश्चिमेकडील हद्दीने डॉ. होमी भाभा रस्त्यास (पाषाण रस्त्यास) मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस डॉ. होमी भाभा रस्त्याने ए.आर.डी. ई. च्या पूर्वेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर हद्दीने मौजे कोथरूड, मौजे पाषाण आणि मौजे एरंडवणा यांच्या सामाईक हद्दीस मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	मौजे कोथरूड, मौजे पाषाण आणि मौजे एरंडवणा यांची सामाईक हद्द जेथे मिळते तेथून मौजे कोथरुड व मौजे पाषाणच्या सामाईक हद्दीने मौजे पाषाण, मौजे बावधन खुर्द यांचे हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तर पश्चिमेस मौजे पाषाण व मौजे बावधन खुर्द यांचे हद्दीने मौजे सुतारवाडी व मौजे बावधन बुद्रुक यांचे हद्दीस मिळेपर्यंत, व पुढे मौजे बावधन बु. व मौजे सुस यांच्या हद्दीने मौजे सुस व मौजे लवळे यांच्या हद्दीस मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	मौजे सुस व मौजे बावधन बु. यांची हद्द मौजे लवळेच्या हद्दीस (पुणे मनपा हद्द) जेथे मिळते तेथून उत्तरेस मौजे लवळे व मौजे सुस च्या हद्दीने व पुढे मौजे नांदे व मौजे सुस च्या हद्दीने व पुढे उत्तरेस मौजे म्हाळुंगे व मौजे नांदे यांच्या हद्दीने मुळा नदीस मिळेपर्यंत.	

१० **लोकसंख्या** **एकूण -८४१२७** **अ.जा. -७२९४** **अ.ज. - ७८४**	**बावधन - भुसारी कॉलनी**	**व्याप्ती:**	एक्झॉटीका सोसायटी, प्लॅनेट नाईन बिस्ट्रो, स्काय एरिस सोसायटी, मोकाई वस्ती, साई वेलोसिटी, करण सनकोस्ट, प्रांजली पाटील नगर, बावधन, भुसारी कॉलनी, शिंदे नगर, रामनगर, माणिक्य नगर, गुरुगणेश नगर, एकलव्य कॉलेज, शास्त्री नगर (पार्ट), सागर कॉलनी, महात्मा सोसायटी, चांदणी चौक, वेद भवन, जिजाई नगर, प्रथमेश सोसायटी, इंदिरा शंकर नगरी इ.	४
		उत्तर:	मौजे सुस, मौजे लवळे व मौजे बावधन बुद्रुक यांची हद्द एकमेकास जेथे मिळते तेथून पूर्वेस मौजे सुस व मौजे बावधन बुद्रुक यांच्या हद्दीने व पुढे मौजे बावधन खुर्द व पुढे पूर्वेस मौजे बावधन खुर्द व मौजे सुतारवाडी यामधील हद्दीने व पुढे कोथरूड-पाषाणच्या हद्दीने जुन्या मनपा हद्दीस मिळेपर्यंत.	
		पुर्व:	मौजे कोथरुड व मौजे पाषाणची हद्द जेथे जुन्या मनपा हद्दीस मिळते तेथून दक्षिणेस जुन्या मनपा हद्दीने व पुढे वनाज मेट्रो डेपोच्या पश्चिमेकडील हद्दीने (कोथरूड कचरा डेपो) पौड रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पौड रोडने पूर्वेस नानासाहेब धर्माधिकारी पथास कोथरूड पोलीस स्टेशन जवळ आनाभाऊ साठे चौकात मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस नानासाहेब धर्माधिकारी पथाने कोथरुड डी. पी. रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस कोथरुड डी.पी. रस्त्याने कै. बिरुजी मोकाटे चौकामध्ये श्रीकांत ठाकरे पथास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेकडे श्रीकांत ठाकरे पथाने व पुढे श्रीकांत ठाकरे पथाच्या सरळ रेषेने गोपीनाथ नगर जवळ मौजे वारजे व मौजे कोथरुडच्या हद्दीस मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	श्रीकांत ठाकरे पथाची सरळ रेषा गोपीनाथ नगर जवळ मौजे वारजे व मौजे कोथरूडच्या हद्दीस जेथे मिळते तेथून पश्चिमेस मौजे वारजे व कोथरूडच्या हद्दीने मौजे बावधन खुर्द व मौजे वारजेच्या हद्दीस मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस मौजे बावधन खुर्दच्या व मौजे वारजे यामधील हद्दीने मौजे बावधन खुर्द व मौजे भूगावच्या हद्दीस मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	मौजे बावधन खुर्द व मौजे वारजे यामधील हद्द जेथे मौजे भूगावच्या हद्दीस मिळते तेथून उत्तरेस मौजे भूगाव, मौजे बावधान खुर्द यांच्या हद्दीने व पुढे उत्तरेस मौजे बावधन बुद्रुक व मौजे लवळेच्या हद्दीने मौजे सुस च्या हद्दीस (मनपा हद्दीस) मिळेपर्यंत.	
११ **लोकसंख्या** **एकूण -७६२०४** **अ.जा. -५५६९**	**रामबाग कॉलनी - शिवतीर्थनगर**	**व्याप्ती:**	शिवतिर्थ नगर, रामबाग कॉलनी, केळेवाडी, हनुमान नगर, एल.आय.सी. कॉलनी, माधव बाग, गिरीजा सोसायटी, दत्त नगर- सुतारदरा, किष्किंदा नगर, ए.आर.ए.आय,एम.आय.टी. कॉलेज, मोरे विद्यालय, भारती विद्यापीठ एरंडवणा, बळवंतपूरम साम्राज्य इ.	४

अ.ज. - ५७४		**उत्तर:**	मौजे कोथरुड व मौजे पाषाणची हद्द जुन्या मनपा हद्दीस जेथे मिळते तेथून पूर्वेस मौजे कोथरुड व मौजे पाषाण यामधील हद्दीने मौजे भांबुर्डा (शिवाजीनगर) व मौजे एरंडवणाच्या हद्दीस वेताळ मंदिराजवळ मिळेपर्यंत.	
		पुर्व:	मौजे भांबुर्डा, मौजे एरंडवणा व मौजे कोथरुडची हद्द जेथे एकमेकांस मिळते त्या वेताळ मंदिरापासून दक्षिण-पूर्वेस मौजे भांबुर्डा (शिवाजीनगर) व मौजे एरंडवणा यामधील हद्दीने विधी महाविद्यालयाच्या उत्तर-पश्चिम कोप-यावरील हद्दीस मिळेपर्यंत तेथून दक्षिणेस विधी महाविद्यालयाच्या पश्चिमेकडील हद्दीने व पुढे शांतीशिला सोसायटीच्या पश्चिमेकडील हद्दीने अमर सोसायटीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस अमर सोसायटीच्या उत्तरेकडील हद्दीने व पुढे हद्दीच्या सरळ रेषेने ARAI कडून येणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने पौड रस्त्यास मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	ARAI कडून येणारा रस्ता पौड रस्त्यास जेथे मिळतो तेथून उत्तरेस व पुढे पश्चिमेस पौड रस्त्याने कै. मिलींद ढोले चौकात किनारा हॉटेल कडून बळवंतपूरम साम्राज्य सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	पौड रस्ता कै. मिलींद ढोले चौकात किनारा हॉटेल कडून बळवंतपूरम साम्राज्य सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यास जेथे मिळतो, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने (रामचंद्र माने रस्त्याने) कांचनबन सोसायटी आणि सहकार वृंद सोसायटीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने जुन्या पुणे मनपा हद्दीस मिळेपर्यंत.	
१२ **लोकसंख्या** **एकूण -७७६६९** **अ.जा. -९४८९** **अ.ज. - ८६९**	**छ. शिवाजी नगर - मॉडेल कॉलनी**	**व्याप्ती:**	हनुमान नगर, वडारवाडी, कमला नेहरु पार्क, बी.एम.सी.सी. कॉलेज, लॉ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, संभाजी उद्यान, पुणे मनपा भवन, घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय, इंजिनिअरींग कॉलेज पुणे, पुणे जिल्हा न्यायालय, पुलाची वाडी,मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर , पोलीस ग्राउंड, पोलीस लाईन, मॉडेल कॉलनी, सिव्हील कोर्ट मेट्रो सेशन इ.	४
		उत्तर:	पुणे विद्यापीठ रस्ता (गणेश खिंड रस्ता) गोखले रस्त्यास जेथे मिळतो, तेथून दक्षिणपूर्वेस पुणे विद्यापीठ रस्त्याने वीर चाफेकर चौकात साखर संकुलच्या पूर्वेकडील रस्त्यास (के.बी. जोशी पथ) मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने छत्रपती शिवाजीनगर मेट्रो स्टेशनच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने शिवाजीनगर रेल्वे स्टेशनला जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पूर्वेस सदर रस्त्याने पुणे - मुंबई रेल्वे लाईनला	

			मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस पुणे - मुंबई रल्वे लाईनने संचेती हॉस्पिटल जवळील एच.के.फिरोदीया पूलावरील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस अभियांत्रिकी महाविद्यालय चौकात पुणे मुंबई रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस पुणे मुंबई रस्त्याने पाटील इस्टेट जवळील संगमवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पूर्वेस सदर रस्त्याने मुळा नदीस मिळेपर्यंत, तेथून पुर्वेस मुळा नदीने मुठा नदीस मुळा मुठा संगम जवळ मिळेपर्यंत.	
		पुर्व:	मुळा नदी मुठा नदीस मुळा मुठा संगम जवळ जेथे मिळते, तेथून दक्षिणपश्चिमेस मुठा नदीने संभाजी पूलावर फर्ग्युसन कॉलेज रस्त्यास मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	मुठा नदी संभाजी पूलावर फर्ग्युसन कॉलेज रस्त्यास जेथे मिळते तेथून उत्तरेस फर्ग्युसन कॉलेज रस्त्याने भांडारकर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस भांडारकर रस्त्याने प्रभात रोड गल्ली क्र. ७ ला मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस गल्ली क्र. ७ ने प्रभात रस्त्यास गुरु रोहिणी भाटे चौकात मिळेपर्यंत तेथून पश्चिमेस प्रभात रस्त्याने विधी महाविद्यालय रस्ता ओलांडून पुढे विधी महाविद्यालयाच्या दक्षिणेकडील हद्दीने हनुमान टेकडी व विधी महाविद्यालयाच्या पश्चिमेकडील सामाईक हद्दीस मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	विधी महाविद्यालयाची दक्षिणेकडील हद्द हनुमान टेकडी व विधी महाविद्यालयाच्या पश्चिमेकडील सामाईक हद्दीस जेथे मिळते तेथून उत्तरेस सदर सामाईक हद्दीने व पुढे उत्तर पूर्वेस बालभारतीच्या पश्चिमेकडील हद्दीने व पुढे उत्तरेस सेनापती बापट रस्त्याने पानकुंवर फिरोदिया रस्त्यास मिळेपर्यंत तेथून पूर्वेस सदर रस्त्याने गोखले रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस गोखले रस्त्याने पुणे विद्यापीठ रस्त्यास (गणेश खिंड रस्त्यास) मिळेपर्यंत.	
१३ **लोकसंख्या** **एकूण -८८५६९** **अ.जा. -१९६४०** **अ.ज. -१४७१**	**पुणे स्टेशन - जय जवान नगर**	**व्याप्ती**:	ताडीवाला रोड झोपडपट्टी, प्रायव्हेट रोड झोपडपट्टी, निसर्गोपचार केंद्र, आर.टी.ओ., श्री शिवाजी प्रि. मिलिटरी शैक्षणिक संकुल, कैलास स्मशानभूमी, नायडू हॉस्पिटल, बी. जे. मेडिकल कॉलेज व ग्राउंड, आगरकर नगर, पुणे रेल्वे स्टेशन, नायडू हॉस्पिटल, सेंट्रलबिल्डिंग, ससून हॉस्पिटल, रुबी हॉल क्लिनीक, वाडीया कॉलेज, जहांगिर हॉस्पिटल, जे.एन. पेटीट हायस्कूल, कसबा पेठ (पार्ट), कागदी पुरा परिसर, तारकेश्वर मंदिर, राम नगर येरवडा, लक्ष्मी नगर येरवडा, क्रांतीवीर लहूजी वस्ताद सांस्कृतिक भवन, हकिम अजमल खान उर्दू शाळा, स्व. राजीव गांधी हॉस्पिटल इ.	४

उत्तर:	मुठा नदी जेथे नव्या पूलावर (छ.शिवाजी पूल) छ. शिवाजी रस्त्यास जेथे मिळते तेथून उत्तर-पूर्वेस मुठा नदीने पुणे-मुंबई रेल्वे लाईन ओलांडून मुळा मुठा संगमापर्यंत पुढे पूर्वेस मुळा मुठा नदीने योजना पोल्ट्री फार्मच्या पश्चिमेकडील नाल्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर नाल्याने डेक्कन कॉलेज रस्ता ओलांडून डेक्कन कॉलेजच्या पूर्वेकडील डी.पी. रस्त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने शहीद भगतसिंग चौकात गुरुद्वाराच्या दक्षिणेकडील पूर्वपश्चिम रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस गुरुद्वाराच्या दक्षिणेकडील रस्त्याने (हकीम अजमल खान उर्दु हायस्कूल आणि क्रांतिवीर लहूजी वस्ताद सांस्कृतिक भवन यांच्या उत्तरेकडील रस्ता) कुमार पर्णकुटीच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत.
पुर्व:	गुरुद्वाराच्या दक्षिणेकडील रस्ता (हकीम अजमल खान उर्दु हायस्कूल आणि क्रांतिवीर लहूजी वस्ताद सांस्कृतिक भवन यांच्या उत्तरेकडील रस्ता) कुमार पर्णकुटीच्या पश्चिमेकडील रस्त्यास जेथे मिळतो तेथून दक्षिणेस कुमार पर्णकुटीच्या पश्चिमेकडील रस्त्याने पुढे दक्षिणेस मेथाडीस्ट चर्च आणि लक्ष्मी निवास यांच्या पूर्वेकडील रस्त्याने व पुढे भारतरत्न कै. राजीवगांधी हॉस्पिटलच्या पूर्वेकडील रस्त्याने डेक्कन कॉलेज रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस डेक्कन कॉलेज रस्त्याने बंडगार्डन पुलावर कोरेगाव पार्क रस्त्यास जेथे मिळते तेथून दक्षिणेस मुळा मुठा नदी ओलांडून कोरेगाव पार्क रस्त्याने पुणे मुंबई रेल्वे लाईनला मिळेपर्यंत (पुणे कॅन्टोन्मेंट ची हद्दीस) तेथून पश्चिमेस व पुढे दक्षिणेस पुणे कॅन्टोन्मेंट च्या हद्दीने नवीन पुणे जिल्हा परिषद इमारतीजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्यास मिळेपर्यंत.
दक्षिण:	पुणे कॅन्टोन्मेंट ची हद्द नवीन पुणे जिल्हापरिषद इमारतीजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्यास जेथे मिळते तेथून पश्चिमेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्याने मुदलियार रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस मुदलियार रस्त्याने माळी महाराज रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस माळी महाराज रस्त्याने पी.एम. चौरे रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस पी.एम चौरे रस्त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तर पश्चिमेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ओलांडून वीर संताजी घोरपडे पथास मिळेपर्यंत, तेथून दक्षिण पश्चिमेस वीर संताजी घोरपडे रस्त्याने नागझरी नाल्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस नागझरी नाल्याने आगरवाल रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस आगरवाल रस्त्याने पवळे चौक ओलांडून छ. शिवाजी रस्त्यास मिळेपर्यंत.

		पश्चिम:	आगरवाल रस्ता पवळे चौकात छ. शिवाजी रस्त्यास जेथे मिळतो, तेथून उत्तरेस छ. शिवाजी रस्त्याने मुठा नदीस नव्या पूलावर (छ.शिवाजी पूल) मिळेपर्यंत.	
१४ **लोकसंख्या** **एकूण -९११६०** **अ.जा. -१७२३३** **अ.ज. -१०२६**	**कोरेगाव पार्क - मुंढवा**	**व्याप्ती**:	कोरेगांव पार्क, अतुर पार्क सोसायटी, गणेश नगर, रागविलास सोसायटी, राहुल सोसायटी, डेमको सोसायटी, श्रावस्ती नगर, घोरपडी, पासपोर्ट ऑफीस मुंढवा, कवडेवाडी, मौलाना अबुल कलाम आझाद स्मारक, कलाशंकर नगर घोरपडी, भिमनगर वसाहत, शिंदे वस्ती, घोरपडी रेल्वे वसाहत, ओशो आश्रम, मुंढवा गावठाण, मगरपट्टा सिटी (पार्ट), घोरपडी गाव पुणे कँटोन्मेंटचा भाग वगळून इ.	४
		उत्तर:	मुळा मुठा नदी बंडगार्डन पुलावर कोरेगाव पार्क रस्त्यास जेथे मिळते तेथून पूर्वेस मुळा मुठा नदीने खराडी मुंढवा रस्त्यास मुंढवा पुलावर मिळेपर्यंत.	
		पूर्व:	मुळा मुठा नदी खराडी मुंढवा रस्त्यास मुंढवा पुलावर जेथे मिळते, तेथून दक्षिणेस खराडी मुंढवा रस्त्याने पुणे सोलापूर रेल्वे लाईन ओलांडून (मगरपट्टा रस्त्याने) ACAACIA सोसायटीच्या दक्षिणेकडील रस्त्याच्या सरळ रेषेश (बंगला नं. ३८) मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सीमाभिंत ओलांडून सदर सरळ रेषेने व पुढे रस्त्याने थीमड गार्डन चौक ओलांडून व पुढे डॅफोडील्स सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्याने सायबरसिटी टॉवर-२ च्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सायबरसिटी टॉवर-१६ च्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने आयरिस सोसायटीच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने हेलेकोनीय सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	आयरिस सोसायटीच्या पूर्वेकडील रस्ता हेलेकोनीय सोसायटी च्या उत्तरेकडील रस्त्यास जेथे मिळतो तेथून पश्चिमेस हेलेकोनीय सोसायटी च्या उत्तरेकडील रस्त्याने व पुढे उत्तरेस जस्मेनियम सोसायटीच्या पश्चिमेकडील रस्त्याने जस्मेनियम सोसायटी इमारत क्र. एम पासून इंटरवाल्वे पूनावाला कडे जाणाऱ्या रेषेस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रेषेने नवीन मुठा कालव्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस व पुढे पश्चिमेस नवीन मुठा कालव्याने ब्रम्हाबाग सोसायटीच्या पूर्वेकडे ॲक्युरेट इंजिनीअरिंग कंपनी जवळ जुन्या मुठा कालव्याकडून येणाऱ्या रेषेस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सरळ रेषेने जुना मुठा कालव्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस जुना मुठा कालव्याने बी.टी. कवडे रोड ओलांडून पुणे मिरज रेल्वे लाईनला मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस पुणे मिरज रेल्वे लाईनने व पुढे पुणे कॅन्टोन्मेंट हद्दीने कोरेगाव पार्क रस्त्यास मिळेपर्यंत.	

		पश्चिम:	पुणे कँन्टोन्मेंटची हद्द कोरेगाव पार्क रस्त्यास जेथे मिळते तेथून उत्तरेस कोरेगाव पार्क रस्त्याने मुळा मुठा नदीस बंड गार्डन पुलावर मिळेपर्यंत.	
१५ **लोकसंख्या** **एकूण -९३४७०** **अ.जा. -१३५२०** **अ.ज. -१६१७**	**मांजरी बुद्रुक - साडेसतरा नळी**	**व्याप्ती**:	थिटे वस्ती, खराडी, रिव्हर डेल हाइट्स, न्याती इलीसिया, गिरीधर ओयासिस, गंगा सेरिओ, मुंढवा, तारा आंगण, शरद नगर, गोदरेज इन्फिनिटी, केशवनगर, हनुमान नगर, चिंतामणी सोसायटी, घुले नगर, शिवकृष्ण सोसायटी, सिद्धिविनायक कॉलनी, लोणकर नगर, आनंद नगर, ॲमनोरा पार्क टाऊन, गोडबोले वस्ती, कमल कॉलनी, अनाजी वस्ती, घुले वस्ती, मांजरी, मांजरी बु., वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट कॉलनी, बेलेकर वस्ती, भापकर मळा, घुले पार्क, विठ्ठल नगर, साडेसतरा नळी, चंदननगर, टाकळे नगर, जय मल्हार कॉलनी, महादेव नगर, तुकाराम तुपे नगर, मांजरी ग्रीन सोसायटी, शेवाळे वाडी इ.	४
		उत्तर:	खराडी मुंढवा रस्ता हॉटेल फेअरफिल्ड च्या दक्षिणेकडील रस्त्यास जेथे मिळतो तेथून पूर्वेस सदर रस्त्याने व पुढे पूर्वेस वैष्णवी पार्क इमारतीच्या दक्षिणेकडील हद्दीने तळजाई बिरोबा निवास इमारतीच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस व पुढे पूर्वेस तळजाई बिरोबा निवास इमारतीच्या पश्चिम व उत्तरेकडील हद्दीने व पुढे दक्षिणेस सदर इमरतीच्या पूर्वेकडील हद्दीने स.न. १३, काळूबाई नगर, थिटे वस्ती मधील रामचंद्र निवास इमारतीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने (एंजल हाऊस अपार्टमेंट च्या दक्षिणेकडील हद्दीने) गुलमोहर पॅरेडाईज च्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिणपूर्वेस अद्विक मेडिकलच्या पूर्वेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने दत्त चौक ओलांडून पुढे दक्षिणेस थिटे वस्तीतील गल्ली क्र. १४ ने आशियाना इमारतीच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने व पुढे सदर रस्त्याच्या सरळरेषेने ग्रेशियस गार्डन इमारतीच्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने ग्रेशियस गार्डन इमारतीच्या उत्तरेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने व पुढे श्रीकृष्ण कॉलनीतील गल्ली क्र. १ ने रिव्हरडेल युनिटी प्रकल्पाच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर हद्दीने रिव्हरडेल ग्रांड या इमारतीच्या दक्षिणेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने नदीकाठचा रस्ता ओलांडून मुळा मुठा नदीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस मुळा मुठा नदीने मौजे वाघोली, मौजे मांजरी खुर्द व मौजे मांजरी बुद्रुक यांच्या सामाईक हद्दीस मिळेपर्यंत.	

		पुर्व:	मुळा मुठा नदी मौजे वाघोली, मौजे मांजरी खुर्द व मौजे मांजरी बुद्रुक यांच्या सामाईक हद्दीस जेथे मिळते तेथून दक्षिणेस मुळा मुठा नदीने मौजे लोणी काळभोर व मौजे मांजरी बुद्रुक यांच्या हद्दीवरील नाल्यास मिळेपर्यंत.	
		दक्षिण:	मुळा मुठा नदी मौजे लोणी काळभोर व मौजे मांजरी बुद्रुक यांच्या हद्दीवरील नाल्यास जेथे मिळते तेथून दक्षिणेस सदर नाल्याने पुणे सोलापूर रेल्वे लाईन व पुणे सोलापूर रस्ता ओलांडून पुढे दक्षिणेस सदर नाल्याने (मौजे शेवाळवाडी व मौजे फुरसुंगी हद्दीवरील नाला) जुन्या मुठा कालव्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस व पुढे उत्तरेस सदर जुन्या मुठा कालव्याने मौजे मांजरी बुद्रुक व मौजे फुरसुंगी यांच्या हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने मौजे हडपसरच्या हद्दीस मिळेपर्यंत. (रामचंद्र बनकर शाळेजवळ)	
		पश्चिम:	मौजे मांजरी बुद्रुक व मौजे फुरसुंगी यांची हद्द मौजे हडपसरच्या हद्दीस जेथे मिळते (रामचंद्र बनकर शाळेजवळ) तेथून उत्तरेस व पुढे पश्चिमेस मौजे हडपसर व मौजे मांजरीबुद्रुक यांच्या हद्दीने व पुढे पश्चिमेस मौजे साडेसतरा नळी व मौजे हडपसर यांच्या हद्दीने व पुढे उत्तरेस आणि परत पश्चिमेस मौजे साडेसतरा नळीच्या हद्दीने व पुन्हा उत्तरेस सदर हद्दीने कल्याण ज्वेलर्स (कुमार प्लॅनेट) च्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने खराडी मुंढवा रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस खराडी मुंढवा रस्त्याने पुणे सोलापूर रेल्वे लाईन, मुळा मुठा नदी ओलांडून हॉटेल फेअरफिल्डच्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत.	
१६ **लोकसंख्या** **एकूण -९२२३२** **अ.जा. -९५५२** **अ.ज. - ६९०**	**हडपसर - सातववाडी**	**व्याप्ती:**	हडपसर गाव, ससाणे नगर, काळे पडळ, निर्मल टाऊनशिप, साई कॉलनी, उत्कर्ष नगर, सातववाडी, गोंधळेनगर, हडपसर ग्लायडिंग सेंटर, कानिफनाथ कॉलनी, अमर सृष्टी, १५ नंबर, सातव नगर, अमर लता सोसायटी, टक्कर एनक्लेव्ह इ.	४
		उत्तर:	वैभव मल्टीप्लेक्सच्या पश्चिमेकडील हद्द पुणे सोलापूर रस्त्यास जेथे मिळते तेथून पूर्वेस पुणे सोलापूर रस्त्याने जुना मुठा कालव्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस जुना मुठा कालव्याने मौजे मांजरी बुद्रुक व मौजे हडपसरच्या हद्दीस मिळेपर्यंत.(अमर सृष्टीची उत्तरेकडील हद्द)	
		पुर्व:	जुना मुठा कालवा मौजे मांजरी बुद्रुक व मौजे हडपसरच्या हद्दीस जेथे मिळतो तेथून पूर्वेस मौजे हडपसर व मौजे मांजरी बुद्रुक च्या हद्दीने व पुढे दक्षिणेस सदर हद्दीने (अमर सृष्टीची पूर्वेकडील हद्द) मौजे हडपसर, मौजे फुरसुंगी च्या हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर हद्दीने व पुढे दक्षिणेस मौजे हडपसर व मौजे फुरसुंगीच्या हद्दीने पुणे - मिरज रेल्वे लाईनला मिळेपर्यंत.	

		दक्षिण:	मौजे फुरसुंगी व मौजे हडपसर यांची हद्द पुणे मिरज रेल्वे लाईनला जेथे मिळते, तेथून उत्तर पश्चिमेस पुणे मिरज रेल्वे लाईनने सय्यदनगर रेल्वे क्रॉसींग ओलांडून हडपसर स. नं. ३११ च्या पश्चिमेकडील नाल्यास मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	पुणे मिरज रेल्वे लाईन जेथे हडपसर स. नं. ३११ च्या पश्चिमेकडील नाल्यास मिळते तेथून उत्तरेस सदर नाल्याने सेजल रेसिडेन्सीच्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने वैभव मल्टीप्लेक्सच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर हद्दीने पुणे सोलापूर रस्त्यास मिळेपर्यंत.	
१७ **लोकसंख्या** **एकूण -९२६६५** **अ.जा. -१९०७०** **अ.ज. -११९०**	**रामटेकडी - माळवाडी**	**व्याप्ती**:	रामटेकडी, रामटेकडी इंडस्ट्रीयल एरिया, वैदुवाडी, सुंदर संकुल, हेलीकोनीया अपार्टमेंट, ग्रीन पार्क, भोसले नगर, लक्ष्मी विहार, माळवाडी, गाडीतळ, साधना सोसायटी, इंद्रप्रस्थ सोसायटी, मगरपट्टा सिटी (पार्ट), आकाशवाणी इ.	४
		उत्तर:	जुना मुठा कालव्याच्या पूर्वेकडील रस्ता (सुधासुमन सोसायटीच्या पूर्वेकडील रस्ता) हेलीकोनिया सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्यास जेथे मिळतो तेथून पूर्वेस सदर रस्त्याने ग्रेवेलीया सोसायटी च्या पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने सायबर सिटी टॉवर क्र. १६ च्या दक्षिणेकडील रस्त्यास व पुढे पूर्वेस सदर रस्त्याने व पुढे उत्तरेस सायबर सिटी टॉवर क्र. २ च्या पूर्वेकडील रस्त्याने डॅफोडील्स सोसायटीच्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने, थीमड गार्डन चौक ओलांडून पुढे पूर्वेस (ACAACIA गार्डन बंगला नं. ३८ च्या दक्षिणेकडील हद्द) सदर रस्त्याने मगरपट्टा मुंढवा रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर रस्त्याने कल्याण ज्वेलर्स (कुमार प्लॅनेट) च्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर रस्त्याने मौजे हडपसर, मौजे साडेसतरा नळी या हद्दीवरील नाल्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर नाल्याने व पुढे पूर्वेस मौजे साडेसतरा नळी व मौजे हडपसर यांच्या हद्दीने जुना मुठा कालव्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस जुना मुठा कालव्याने मौजे साडेसतरा नळी व मौजे हडपसर यांच्या हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस सदर हद्दीने व पुढे मौजे हडपसर व मौजे मांजरी ब्रुद्रुक यांचे हद्दीने जुना मुठा कालव्यास मिळेपर्यंत. (अमरसृष्टीच्या पश्चिमेकडील कालवा)	
		पुर्व:	मौजे हडपसर व मौजे मांजरी ब्रुद्रुक यांची हद्द जुना मुठा कालव्यास जेथे मिळते, (अमरसृष्टीच्या पश्चिमेकडील कालवा) तेथून दक्षिणेस जुना मुठा कालव्याने पुणे सोलापूर रस्त्यास मिळेपर्यंत.	

		दक्षिण:	जुना मुठा कालवा पुणे सोलापूर रस्त्यास जेथे मिळतो तेथून पश्चिमेस पुणे सोलापूर रस्त्याने वैभव मल्टीप्लेक्सच्या पश्चिमेकडील हद्दीस मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर हद्दीने सम्राट गार्डनच्या दक्षिणेकडील रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने राम मनोहर लोहिया उद्यानाच्या पूर्वेकडील नाल्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर नाल्याने पुणे मिरज रेल्वे लाईनला मिळेपर्यंत, तेथून दक्षिण पूर्वेस पुणे मिरज रेल्वे लाईनने ससाणे नगर रस्त्यास (पंचरत्न, पितृछाया या इमारतीच्या उत्तरेकडील रस्ता) मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेस सदर रस्त्याने सय्यद नगरच्या पूर्वे कडील नाल्यास मिळेपर्यंत, तेथून दक्षिणेस सदर नाल्याने मौजे हडपसर व मौजे महंमदवाडी यांचे हद्दीस मिळेपर्यंत, तेथून पश्चिमेससदर हद्दीने मौजे हडपसर व मौजे वानवडी यांचे हद्दीस मिळेपर्यंत.	
		पश्चिम:	मौजे हडपसर व मौजे महंमदवाडी यांची हद्द मौजे हडपसर व मौजे वानवडी यांचे हद्दीस जेथे मिळते तेथून उत्तरेस हडपसर-वानवडी हद्दीने व पुढे AIPT च्या पूर्वेकडील रस्त्याने पुणे सोलापूर रस्त्यास मिळेपर्यंत, तेथून पूर्वेस पुणे सोलापूर रस्त्याने पुणे मिरज रेल्वे लाईन ओलांडून जुन्या मुठा कालव्या शेजारील रस्त्यास (मेगा सेंटर जवळ) मिळेपर्यंत, तेथून उत्तरेस सदर रस्त्याने (सुधासुमन सोसायटीच्या पूर्वेकडील रस्ता) हेलीकोनिया सोसायटी च्या उत्तरेकडील रस्त्यास मिळेपर्यंत.	
